**Job Fair on 27th June under *'Shasan Aplya Daari'***

### कंपन्यांनी कळवले २१४१ रिक्त पदे

# 'शासन आपल्या दारी' अंतर्गत २७ जून रोजी रोजगार मेळावा

जळगाव | शासन आपल्या दारी अभियानांतर्गत जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व नूतन मराठा महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने २७ जून रोजी सकाळी १० वाजता नूतन मराठा महाविद्यालय येथे रोजगार मेळावा होणार आहे.

नोकरी इच्छुक उमेदवारांसाठी ही एक सुवर्णसंधी आहे. सर्वसाधारण दहावी व बारावी, सर्व पदवीधारक, आयटीआय सर्व ट्रेड, डिप्लोमा सर्व ट्रेड, बीई मेकॅनिकल, बीसीए, एमबीए, बीई, डी.फॉर्म, बी.फॉर्म, सर्व डिग्रीधारक असे एकूण २२४१ रिक्त पदे भरण्याविषयी विविध कंपन्यांनी कळवले आहे. या मेळाव्यात नमूद पात्रता धारण केलेल्या इच्छुक उमेदवारांनी सहभागी होण्यासाठी विभागाच्या www.mahaswayam.gov.i n संकेतस्थळावर उपलब्ध रिक्तपदांसाठी अर्ज करावा. त्यासाठी यूजरआयडी व पासवर्डने लॉगिन करून अप्लाय करावा. ज्या उमेदवारांनी नावनोंदणी केलेली नाही. त्यांनी देखील सर्व शैक्षणिक पात्रतेच्या कागदपत्रांसह मेळाव्यात मुलाखतीसाठी वेळेवर हजर राहावे. विभागाच्या www.mahaswayam.gov.i n या संकेतस्थळावर नाव नोंदणी करुन घ्यावी असे आवाहन करण्यात आले आहे.